# पिंपरी चिंचवड सायन्स पार्क, चिंचवड, पुणे-४११०१९

## निविदा फॉर्म - प्रपत्र 'अ'

## उद्यान विभाग

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध उद्याने देखभाल विकास व संरक्षण करणे कामाबाबतच्या अटी/शर्ती

१. सदर निविदेतील कामाचा तपशिल, अनामत, बयाणा रक्कम, नियम , अटी, निविदा शेड्युल इत्यादी माहिती सायन्स पार्कच्या www.pcsciencepark.org या वेबसाईटवर व कार्यालयात उपलब्ध आहे. सदरची निविदा सायन्स पार्कच्या कार्यालय येथे टेडरिंग पध्दतीने भरावयाची आहे. सदरची निविदा भरणेसाठी संस्था नोंदणीकृत असणे आवश्यक आहे. निविदा भरताना आयकर भरत असलेबाबतचा पुरावा, अद्यावत विक्रीकर नोंदणी शॉप अँक्ट दाखल अथवा नोदंणी प्रमाणपत्र, उद्यानविषयक कामाचा अनुभव प्रमाणपत्र इत्यादी मुळ कागदपत्रे सादर करावी लागतील. निविदा धारकांनी निविदेची फॉर्म फी, बयाणा रक्कम सायन्स पार्कच्या खात्यात भरावयाची आहे. सदर निविदेचे फार्म विक्रीसाठी टेवणेत येणार नाहीत व फॉर्म स्विकृतीसाठी निविदा बॉक्स ठेवणेत येणार आहे. सदर कामासाठी उद्यान देखभाल कामाचा शासकीय/निमशासकिय/नामांकित खाजगी, मर्यादित संस्थेकडील कामाचा अनुभव असणे आवश्यक आहे. नोंदणी केलेल्या ठेकेदारांना निविदा भरताना निविदा अतीशर्तीमध्या नमुद आवश्यक त्या कागदपत्रांच्या सत्यप्रती करून झेरॉर्स अँट फाईलव्दारे देण्यात यावे.

२. सदर कामासाठी उद्यान विषयक कामासंबधीचे शॉप अँक्ट नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे.

३. सदर कामसाठी निविदामध्ये नमुद कार्यक्षेत्रा एवढा शासकिय, निमशासकिय खाजगी, मर्यादित संस्थेकडील देखभाल कामाचा सलग ३ वर्ष अनुभव असणे व त्याप्रमाणे संबधित संस्थेने प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

४. निविदा सोबत खालिल कागदपत्रांच्या सत्यप्रती करून फाईलव्दारे देण्यात याव्यात

क) शॉपअँक्ट नोंदणी प्रमाणपत्र

ख) आ.क्र. ३ व ४ मध्ये नमुद केलेप्रमाणे कामाचा अनुभव असलेबाबत प्रमाणपत्र

ग) कॉन्ट्रक्ट लेबर अँकट नियम १२ अंतर्गत कामगार आयुक्त कार्यालय पुणे यांचे कडील परवाना



घ) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी प्रमाणपत्र

ङ) राज्य कामगार विमा (ई.एस.आर.) प्रमाणपत्र

च) सेल्सटॅक्स प्रमाणपत्र

छ) वर्क्स कॉन्ट्रक् रजिस्ट्रेशन

ज) आयकर भरत असलेबाबतचा पुरावा

५. ज्या ठेकेदाराचे दर मान्य करून त्यास काम देणेत येईल त्या टेकेदारास एकुण निविदा रक्कमेच्या ३ अनामत म्हणुन कराररनामा करणे पुर्वी सायन्स पार्ककडे ठेवावी लागेल उर्वरीत २ % रक्कम रुपये कामाचे रनिंग बिलातून वसुल करणेत येईल. कामाची मुद्त संपलेनंतर ६ महिने कालावधीनंतर अनामत परत करणेत येईल.

६. ज्या ठेकेदारास अथवा ठेकेदारी संस्थेस काम मिळेल यांचा निविदा स्विकृत झालेनंतर करारनामा करणेपुर्वी असा ठेकेदार किंवा ठेकेदारी संस्था मनपाचे विद्यामान नगरसेवक/स्विकृत सदस्य सायन्स पार्कचे संचालक संबंधित नाही. याची खातरजमा करून तशा आशयाचे प्रतिज्ञापत्र र.रू. १००/- चे स्टॅम्प पेपरवर नोटराईज्ड करून द्यावे लागेल.

७. सदरची निविदा स्विकृतीचे अंतिम दिनांकाचे दिवशी दुपारी ३.३० वाजता किंवा निविदा कमिटी ठरविल त्यादिवशी व त्यावेळेस निविदा उघडण्यात येतील त्याबाबतची सुचना मनपा वेबसाईटवर देणेत येईल. निविदा उघडण्याच्या वेळी निविदा धारण स्वत: अथवा त्याचा प्राधीकृत प्रतिनिधी उपस्थित राहू शकतो.

८. प्रस्तुतकामी संस्थेने त्याचे कर्मचा-यास किमान वेतन कायद्याने तरतूदी प्रमाणे वेतन दिले पाहिजे व त्याअनुषंगाने कामगार कायद्याप्रमाणे ई.एस.आय. पगारी रजा, भविष्य निर्वाह निधी, बोनस, गणवेश, बुट, सेवाकर आयकर, इत्यादी बाबींची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

९. प्रस्तुतकामी संबंधित संस्थेकडे कॉनट्रक्ट लेबर अँक्ट १९७० नियम १२ अंतर्गत कामगार आयुक्त कार्यलय पुणे यांचे मार्फत देणेत येणारा परवाना, कर्मचारी, भविश्यनिर्वाह निधी प्रमाणपत्र, राज्य कामगार निधी, ई.एस.आय प्रमाणपत्र सेल्स टॅक्स प्रमाणपत्र, वर्क्स कॉन्ट्रक, रजिस्ट्रेशन, आयकर भरत असलेबाबतचा पुरावा इत्यादी कागदपत्रे आवश्यक आहे.

१०. संस्थेने नेमलेल्या सभासदामुळे सायन्स पार्कचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेस भरपाईची संपुर्ण जबाबदारी संबंधित संस्थेवर राहिल.

११. काम चालू असताना अथवा नैसर्गिक आपत्ती अथवा अन्य कारणाने संस्थेमार्फत नेमणेत आलेल्या कर्मचा-याचे कोणत्याही प्रकारचे नुकसान झालेस त्याची कोणत्याही



प्रकारची जबाबदारी मनपावर राहणार नाही.

१२. सदर कामाची मुद्त २४ माहिने राहिल. तथापी प्रथमत: १२ महिने कालावधीचे कामकाज पाहून कामकाज समाधानकारक वाटलेस पुढील १२ माहिने कालावधी करीता कामकाज देणेत येईल.

१३. प्रस्तुत उद्यान विषयक करावयाचे कामाबाबत सविस्तर तपशिल सोबत देणेत आलेला आहे. त्याप्रमाणे कामाबाबत आढावा घेवून झालेल्या कामाबाबतचे बिल अदा करणेत येईल.

१४. प्रस्तुत निविदा अ.क्र. १२ व १३ साठी सादर करावयाचे दर हे प्रतिमहा प्रति चौ.मी प्रमाणे सबत जोडणेत आलेल्या यादीतील सुशोभिकरण संख्या व एकूण देखभाल क्षेत्र यामध्ये वाढ किंवा घट होऊ शकेल तसेच वाढ /घटनुसार बिलाची रक्कम कमी जास्त केली जाईल.

१५. प्रस्तुत उद्यान देखबाली कामी आवश्यक असणारे साहित्य उदा. खुरपे, घमेले, फावडे, हेजकात्री, कुदळ, सीकेटर, औषधे, लॉन मोअर मशिन इत्यादी संबंधित संस्थेने त्यांचे कर्मचा-यास पुरवावयाचे आहे.

१६. प्रस्तुतकामी सायन्स पार्क मार्फत आवश्यकतेनुसार पाणी, खते, माती, रोपे इत्यादी पुरविणेत येईल.

१७. उद्यान स्वच्छ, सुंदर, सुरक्षित, आकर्षक व तक्रार विरहीत राहिल याची जबाबदारी संस्थेवर राहील.

१८. उद्यान विषयक कामाबाबत संबधित नियंत्रनित अधिका-याकडून देणेत येणा-या आदेशाचे पालन करण्याची जवाबदारी संबदित राहील.

१९. सायन्स पार्कची उद्याने नागरिकांसाठी खुली आहेत. सदर उद्याने सायन्स पार्कच्या नियोजनानुसार खुली ठेवणे, देखभाल दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

२०. उद्यानात असणा-या टॉयलेट/ बाथरूमची दररोज साफसफाई करण्याची जबाबदारी संबधित संस्थेची राहिल.



२१. प्रत्येक उद्यानामध्ये नोंद वही ठेवणे आवश्यक व त्यामधील सूचनाप्रमाणे पुढील कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२२. सायन्स पार्कच्या परिसरातील उद्यानातील सर्व फुटपाथ, मोकळी जागा यांची दररोज साफसफाई, स्वच्छता करण्याची जबाबदारी संबधित संस्थेची राहिल.

२३. त्याचप्रमाणे प्रत्यक्ष दरमहा कामाची संयुक्त पाहणी करून मुल्यांकनाप्रमाणे कामाचे प्रतिमहा बिल अदा करणेत येईल.

२४. अपुर्ण माहिती भरलेली, सर्व कागदपत्रांची पुर्तता न केलेस, बयाणा रक्कम न भरले अटीयुक्त विहित नमुन्यात नसलेले, मुद्तीत नसलेल्या इत्यादी दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

२५. निविदा दर हे सर्व करांसह देणेत यावेत.

२६. निविदा दर १२० दिवस ग्राह्य राहतील.

२७. कामाचा आदेश दिल्यानंतर ठेकेदाराने काम केले नाही. तर त्याची अनामत रक्कम जप्त करणेत येईल.

२८. एकवेळ दरपत्रक सादर केलेनंतर त्यामध्ये कोणत्याही सबबीवर दरवाढ दिली जाणार नाही.

२९. यापुर्वी ठेकेदाराची निविदा स्विकृत केलेचे कळवून ही कामाचा करारनामा करून दिला नसलेने बयाणा रक्कम जप्त करणेत येईल. अशा ठेकेदारांच्या निविदा उघडल्या

जाणार नाहीत व जे ठेकेदार काम मिळूनही कामाचा करारनामा करून देणार नाही अशा ठेकेदारांना २४ महिने कोरे निविदा फॉर्म दिले जाणार नाही.

३०. ज्या ठेकेदारास काम मिळेल त्यास अनामत रक्कमेच्या ३ टक्के अधिक र.रू. १००/- स्टॅम्प पेपरवर व खर्चाने कामाचा करारनामा करून द्यावा लागेल.

३१. कोणतीही निविदा पुर्णत:अथवा अंशत:स्विकारणेचा अथवा नाकारणेचा अधिकार मा. आयुक्त पिं.चिं.मनपा यांनी राखून ठेवला आहे. याबबत कोणतेही कारण दिले जाणार नाही.

4

३२. चौरस मिटर पद्धतीने दिलेल्या निविदा दरामध्ये विहीत व मंजुर दराच्या दर पृथ्थकरणामध्ये धरलेली गृहीतके/विवीध बाबी ठेकेदारावर बंधनकारक राहतील.

३३. सदरची जाहिरात मनपाची www.pcsciencepark.org या वेबसाईडवर उपलब्ध आहे.

३४. सोबत जोडलेले परिशिष्ट अ, ब, व क हे या अटीशर्ती व करारनामा याचा भाग राहतील.

उपरोक्त अटीशर्ती निविदाधारकास बंधन कारक राहतील. त्यामुळे उपरोक्त अटी पैकी कोणत्याही अटी व शर्ती व कायद्यातील तरतूदींचा भंग केल्यास निविदा/ठेका रद्द केला जाईल.
स्थळ प्रतिवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांची स्वाक्षरी असे.

सही/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
पिंपरी चिंचवड सायन्स पार्क
चिंचवड पुणे -१९

वरीलप्रमाणे सर्व अटी, शर्ती मी/आम्ही वाचल्या असून त्या मला/ आम्हाला मान्य आहे./ आहेत. व त्या माझेवर/आमचेवर बंधनकारक राहील/राहतील. त्याबाबत मी/आम्ही खालील स्वाक्षरी / स्वाक्ष-या केली/केल्या आहे/आहेत.

शिक्का

ठेकेदाराची सही -
नाव व पत्ता -
जाहिरात क्रमांक -
क्र. सायन्स पार्क - ०१/२०१६-१७
दिनांक - / /२०१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका निर्मित

पिंपरी चिंचवड सायन्स पार्क

उद्यान विभाग (उद्यानात करावयाचा कामाचा तपशिल )

**परिशिष्ट अ**

उद्यानाची देखभाल

१. उद्यानात हंगामी रोपांची हंगामानुसार लावगड करणे.
२. उद्यानासाठी आवश्यकतेनुसार पिं.चिं.सायन्स पार्कने पुरविलेले खते,औषधे पोयटामाती यांचा वापर करणे.
३. उद्य़ानातील ल़ॉन, हेजेस याची खुरपणी करणे, छाटणी करणे मशागत इत्यादी करणे.
४. उद्यानातील हिरवळ, झाडे, झुडपे, हंगामी फुल, कुंड्या यांना नियमितपणे आवश्यकतेनुसार पाणी देणे.
५. निरनिराळया प्रकारच्या शोभीवंत रोपांची कुंड्यात लागवड करून उद्यान सुशोभित करणे, शोभिंवत झाडे वाढविणे.
६. उद्यानासाठी पिं.चिं.सायन्स पार्कने पुरविलेली किटकनाशके/बुरशी नाशके यांची आवश्यकतेप्रमाणे झाडे-झुडपे व रोपांवर फवारणी करणे.
७. हंगामी फुलझाडांचे बी वेळचेवेळी धरणे.
८. उद्यान रोजचे रोज स्वच्छ व टापटीप ठेवणे, उद्यानातील नियमित निघालेला पालापाचोळा उद्यानातील खड्यामध्ये टाकणे व त्यापासुन कंपोस्ट खत तयार करून त्या खताचा वापर त्यात उद्यानात करणे.
९. उद्यानामध्ये धबधबा /कारंजे असल्यास त्याची साफसफाई नियमितपणे करणे
१०. उद्यानातील फुटपाथ मोकळी जागा उपकरणे यांची नियमित साफसफाई व स्वच्छता करणे.



उद्यानाची विभागत (उद्यानात करावयाचा कामाचा तपशिल)

**परिशिष्ट ब**

उद्याने विकास

१. उद्यानातील जुनी लॉन्स काढुन नविन लॉन्स तयार करणे.
२. उद्यानात नविन झाडे, झुडपे, हेजेस लावणे
३. उद्यानामध्ये आवश्यकतेनुसार रॉकरिज तयार करणे

४. उद्यानाचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सुचनेनुसार नुतनीकरण करणे व पुर्णत नविन कामे करणे.

---------------------------------------------------------------
----------------------------------------------

**परिशिष्ट क**

उद्यानाचे संरक्षण

१. उद्यानातील झाडांचे, झुडपांचे पानाफुलांचे तसेच उद्यानातील संपुर्ण मालमत्तचे संरक्षण करून कोणत्याही मालमत्तेचे अपहरण होणार नाही याची दक्षता घेणे.
२. उद्यानातील हिरवळ, झाडे, झुडपे फुले, खेळणी यांची नासधुस अथवा नुकसान होणार नाही याची दक्षता घेणे.
३. उद्यानाचे जागेचा दुरुपयोग होणार नाही याची दक्षता घेणे.